

# स्वगत मनाशी

सुखदुःखाचे क्षण जीवनात
येतात आणि जातात
कोणते नेमके जपायचे
अन् कोणाला दूर सारायचे
हेच मना तूला आता
शिकायचे, टिपायचे !!
हवेहवेसे सुख भोगतांना
कृतज्ञतेची जाण तू ठेवायची
दुःख आले वाट्याला
तेव्हा प्रयत्नाबरोबर धीर
धरूनी मात त्यावर करायची ---
आपुल्या कर्माची कडूगोड फळे
चाखल्यावीणा अर्थ जीवनाचा नकळे
भोग हे भोगायचे ज्याचे त्यालाच
म्हणूनी हे मना,
संयमानेच सदा पुढे पुढे चालायचे ---
सुखदुःखाशी मैत्री करत करत
सत्याच्या मार्गावरून
लक्ष्याप्रत पोहचायचे
अन् सार्थक जीवनाचे करायचे !! --

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.